MHAH160008382019

## निशाणी २९ खालील आदेश
(सुमन मेंगाळ वि. संजय मेंगाळ)

प्रस्तुत मुळ अर्ज अर्जदाराने सामनेवालांविरुध्द महिलांचे घरगुती हिंसाचापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२, १८, १९ व २३ नुसार न्यायप्रविष्ठ केलेला आहे.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज निशाणी २९ दाखल करुन विनंती केली आहे की, सदर अर्जातील सामनेवाला नं. २ ते ५ यांचे विरूध्द अर्जदार हिस कोणतीही दाद मागणे नसल्याने सदर अर्जातील सामनेवाला नं. २ ते ५ यांची नावे अर्जातून वगळण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर सामनेवाला यांचे म्हणणे मागविले असता सामनेवाला यांनी असे म्हणणे दिले आहे की, अर्ज खोटा आहे. अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. सामनेवाला नं. २ ते ५ यांना विनाकारण प्रस्तुत चौकशी अर्जामध्ये गोवलेले असून त्रास देण्याकामी सामील केल्याचे स्पष्ट आहे. सामनेवाला नं. २ ते ५ यांनी कैफियत/म्हणणे दाखल केलेले आहे. अर्जदार हे मे. कोर्टाचा वेळ वाया घालवत आहेत. सामनेवाला नं. २ ते ५ यांना म्हणणे दाखल करावे लागले तसेच कोर्टाचे हेलपाटे मारावे लागल्याने अर्जदारास हेव्ही कॉस्टचा हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज पाहिला. प्रस्तुत मुळ अर्ज अर्जदाराने सामनेवालांविरुध्द महिलांचे घरगुती हिंसाचापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२, १८, १९ व २३ नुसार न्यायप्रविष्ठ केला आहे. अर्जदार ही तिच्या अर्जाची मालक आहे. अर्जात पक्षकार समाविष्ट अथवा समाविष्ट न करण्याचा अधिकार अर्जदारास आहे. अर्जदार हिने प्रस्तुतचे प्रकरणात अर्ज करून कळविले आहे की, तिला सामनेवाला नं. २ ते ५ यांचे विरूध्द काहीही

तक्रार नाही. अर्जदाराला जर सामनेवाला नं. २ ते ५ विरुध्द तक्रार नसेल किंवा त्यांचेविरूध्द तिची काहीएक मागणी नसेल तर प्रस्तुत अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. परिणामी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना सामनेवाला नं. २ ते ५ यांची नावे कमी करण्यास परवानगी देण्यात येते व त्याबाबतची दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत अथवा त्यापुर्वी करावी.

३. खर्चाबाबत काही आदेश नाही.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.07.09 16:14:18 +0530

दिनांक ०९/०७/२०२६

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, या पी.डी.एफ फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | एस. पी. पालवे,<br>लघुलेखक (श्रेणी – ३) |
| न्यायालयाचे नाव | – | अनंत रा. टेंगसे,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>कोर्ट नं. २, अकोले. |
| आदेश दिनांक | – | ०९/०७/२०२६ |
| न्यायदंडाधिकारी सही | – | ०९/०७/२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | – | ०९/०७/२०२६ |